**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S.(ठाणे):** एमआईडीसी

**Year (वर्ष):** 2023

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0365

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**02/06/2023 13:47

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Time Period (कालावधी):** पहर 7

**Date From (दिनांक पासून):** 04/05/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 04/05/2023

**Time From (वेळेपासून):** 19:23 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 21:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 02/06/2023 **Time (वेळ):** 13:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 019

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/06/2023 13:39 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** एमआयडीसी पोलीस ठाणे,सोलापुर शहर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): समीर मोहमद शरीफ बच्चुभाई

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1998

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | राहुल गांधी झोपडपट्टी, घर नं4,मन्सुर लन्ड्रीच्या जवळ,सोलापूर, एमआईडीसी,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | राहुल गांधी झोपडपट्टी, घर नं4,मन्सुर लन्ड्रीच्या जवळ,सोलापूर, एमआईडीसी,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | इस्माईल बागवान | | | 1. सी-85, एकता नगर, ,सोलापूर, एमआईडीसी,सोलापुर शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** | **UIDB Number** |
|---|---|
| **(अ.क्र.)** | **(यु.आय.डी.बी.क्र.)** |

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि.02.06.2023

मी समीर मोहमद शरीफ बच्चुभाई, वय 25 वर्षे, व्यवसाय गवंडीकाम, रा. राहुल गांधी झोपडपट्टी, घर नं.404, मन्सुर लॉन्ड्रीच्या जवळ, सोलापूर मो. नं. 7499945321 समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की,
मी वरील ठिकाणी माझ्या कुटूंबासह राहण्यास असुन गवंडी काम करुन माझ्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवतो. दि. 01.05.2023 रोजी माझ्या मोटार सायकलमधील पेट्रोल संपल्याने मी माझा मित्र यासिन मुल्ला याची मोटार सायकल एम.एच.25 ई.0994 ही तात्पुरती वापरायला घेतली होती. दि.01.05.2023 रोजी मी माझ्या कामावरुन घरी परत जात असताना ठेकेदार मलंग फुलारी यांनी मला अडवून त्यांच्याकडून मी पुर्वी कामासाठीचे ऍडव्हान्स म्हणून घेतलेले 5000/- रू. परत दे नाही तर तुझी गाडी मी घेवून जातो असे म्हणून माझेकडील मोटार सायकल ताब्यातुन काढून घेतली. त्यामुळे दि.02/05/2023 रोजी मी व माझा मित्र यासिन मुल्ला असे एमआयडीसी पोलीस ठाणे येथे तक्रार देण्यासाठी गेलो असता, त्याठिकाणी यासिन मुल्ला याच्या ओळखीचे अजहर मेंबर भेटले. त्यावेळी त्यांनी आम्हाला एमआयडीसी पोलीस ठाणे येथे त्यांचे ओळखीचे बागवान साहेब आहेत असे सांगुन आम्हाला पोलीस बागवान यांचेकडे घेवून गेले. त्यावेळी पोलीस बागवान यांनी आमची तक्रार ऐकुन घेऊन मलंग फुलारी यास पोलीस स्टेशनला बोलावून घेऊन माझ्याकडून घेतलेली मोटार सायकल ताब्यात घेतली. त्यानंतर सदरची मोटार सायकल माझ्या ताब्यात परत देण्यासाठी पोलीस बागवान यांनी माझेकडे 3000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यामुळे मी दि.03.05.2023 रोजी ऍन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर येथील ई-मेल आयडीवर ऑनलाईन लाच मागणीची तक्रार दिली. त्यावरुन दि.04.05.2023 रोजी पोनि चंद्रकांत कोळी यांनी मला फोन करुन कार्यालयात बोलावुन घेवून माझी सविस्तर तक्रार विचारुन घेतली. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीवर कारवाई करण्यासाठी पोनि कोळी यांनी दोन शासकीय पंच उपलब्ध करून घेतले. दोन्ही पंचासमक्ष मी माझी तक्रार कथन करून लेखी तक्रार लिहून दिली. त्यावर पंचांनी व पोनि कोळी यांनी वाचुन सह्या केल्या.
त्यानंतर पोनि कोळी यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून त्या व्हाईस रेकॉर्डमध्ये त्यांचेकडील नवीन मेमरीकार्ड टाकले. त्यानंतर पोलीस बागवान यांची पडताळणी करण्याचे अनुषंगाने मला तसेच पंच क्र.01 यांना योग्य त्या सुचना दिल्या आणि व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकावून एमआयडीसी पोलीस ठाणेस रवाना केले. मी व पंच असे एम आय डी सी पोलीस ठाण्यात गेलो असता तेथे पोलीस बागवान हे हजर नसल्याने, त्यांना माझ्या मोबाइल क्रमांकावरुन फोॅन केला असता पोलीस बागवान यांनी आ रहा असे म्हणुन फोन बंद केला. त्यांनतर थोडयावेळानी पोलीस बागवान हे पोलीस ठाण्यात आले त्यावेळी मी त्यांना हिंदीमध्ये कारवाई करु नका, काय करायचे बोला असे म्हणले असता, पोलीस बागवान यांनी अझहर मेंबरला सांगितले आहे की असे म्हणाले. त्यावर मी पोलीस बागवान यांना अझहर मेंबर यांनी साहेबाना भेटुन बोलुया असे बोलल्याचे सांगितले. त्यानंतर मी बागवान साहेबांना बोला साहेब तुम्ही असे म्हणालो असता बागवान साहेबानी त्यांच्या डाव्या हाताची चार बोटे वर करुन बोल्या तो उसको असे बोलुन माझेकडे चार हजार रुपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना चार हजार का असे विचारले असता त्यांनी मान हालवून होकार दिला. त्यावर मी त्यांना तेवढे नाही होणार असे बोललो असता बागवान साहेब यांनी मला काम छोटे नाही गाडी जमा करावी लागते असे बोलले. त्यावर मी त्यांना मला चार पाचशे पगार असल्याचे सांगितले असता बागवान साहेब हे मला तुझी गाडी जमा करतो तु अझहर मेंबरला घेवुन ये असे बोलुन तेथुन निघुन गेले. त्यानंतर मी पंचासह ऍन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात परत जाऊन पोनि कोळी यांची भेट घेतली. त्यावेळी पोनि कोळी यांनी मला व पंच 01 यांना घडलेली हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुन खात्री केली. सदर रेकॉर्डींगमध्ये पोलीस बागवान यांनी बोल्या तो उसको असे बोलुन हाताचे इशाऱ्याने पैसे मागणी केल्याचे स्पष्ट झाले. बागवान साहेब यांनी अजहर मंेबर यास घेवुन येण्यास सांगितले असल्याने सदर दिवशी कारवाई तात्पुरती स्थगित केली.

त्यानंतर दिनांक 05.05.2023 रोजी मी ऍन्टी करप्शन ऑफीस मध्ये येवुन अजहर मेंबर यांची पडताळणी करून पोलीस बागवान यांची भेट घेण्यासाठी त्याला कॉल केला असता त्यांनी एक दोन वेळा फोन उचलुन 7.00 वाजता कॉल करण्यास सांगितले. त्यांनतर पुन्हा मी 7.00 वा. चे सुमारास पंचासमक्ष अजहर मेंबर यास कॉल केला असता त्यांनी माझा फोन उचलला नाही त्यामुळे पोलीस बागवान याना कॉल लावला असता त्यांनी सुध्दा कॉल उचलला नाही. त्यामुळे सदर दिवसाची कारवाई स्थगित केली व मला बागवान सांहेबाचा कॉल आल्यानंतर पुढील कारवाई करण्याचे ठरले.
दि.07.05.2023 रोजी मला पोलीस बागवान यांनी फोन करुन दि. 09/05/2023 रोजी सायकांळी 07.00 वाजता भेटण्यास बोलवले. सदरची बाब मी पोनि कोळी यांना सांगितली.

त्यांनतर मी दि.09.05.2023 रोजी ऍन्टी करप्शन ब्युरो कार्यालय सोलापूर येथे जाऊन पोनि कोळी यांची भेट घेतली. त्यावेळी पोनि कोळी यांनी शासकीय पंचांना बोलावून घेतले होते. त्यानंतर पोनि कोळी यांचे सुचनेवरुन मी पोलीस बागवान यांना लाच रक्कम देणेसाठी माझ्याकडे असलेले 4000/- रू. रुपयांच्या नोटा हजर केल्या. पोनि कोळी यांनी सदर नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन त्या नोटा माझ्या शर्टाचे डावे बाजुचे खिशात ठेवली आणि मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस बागवान यांच्यावर सापळा कारवाई करण्याकरीता व्हॉईस रेकॉर्डर चालु करून ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्या दुचाकी वरुन एमआयडीसी पोलीस ठाणे येथे रवाना केले तसेच आमचे पाठोपाठ पोनि कोळी, पंच 02 व सापळा पथक असे खाजगी वाहनातुन सदर ठिकाणी येवुन परिसरात सापळा लावुन थांबले. त्यावेळी पोलीस बागवान यांनी मला हिंदीमध्ये तु का आलास, गाडी मालक यासीन व गॅरेजवाला यांना का घेवुन आला नाही असे म्हणाले त्यावर मी तुम्हीच बोलवले असल्याने मी आलो असे सांगितले. त्यानंतर पोलीस बागवान यांना मला जाण्यास सांगितले त्यामुळे मी व पंच क्र. 01 ऍन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाकडे परत निघालो. आमच्या मागे पोनि कोळी व सापळा पथक कार्यालयात परत येऊन माझ्या गळयातील व्हाईसरेकॉर्डर बंद करून ताब्यात घेऊन घडलेल्या हकीकतीबाबत मला आणि पंच क्र 01 यांना विचारून आणि व्हाईसरेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेल्या संभाषणावरून खात्री करून घेतली. त्यानंतर सापळापुर्व व सापळा पंचनामा ऍन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात पूर्ण करण्यात आला.
सापळा कारवाईवेळी पोलीस बागवान यांनी माझ्यासोबत गॅरेजवाला व यासिन मुल्ला आला नाही म्हणून सदरची लाचेची रक्कम स्विकारली नाही. बागवान साहेब हे मला यासिन यास घेवुन येण्यास सांगत असल्याने मी यासिन मुल्ला याची भेट घेवुन बागवान साहेबाविरुध्द ऍन्टी करप्शन कार्यालयात तक्रार दिल्याचे सांगुन त्याकरीता माझ्यासोबत येण्यास सांगितले असता त्याने माझ्यासोबत येण्यास नकार दिला. यासिन मुल्ला हा माझ्या सोबत येण्यास तयार नाही त्यामुळे बागवान साहेब हे माझ्याकडून लाचेची रक्कम स्विकारतील असे मला वाटत नसल्याने दि.04.05.2023 रोजी झालेल्या पडताळणी कारवाईवरून पोलीस बागवान यांच्यावर लाच मागणीच्या अनुषंगाने पुढील योग्य ती कारवाई करणेबाबत मी पोनि कोळी यांचेसमक्ष जबाब दिला आहे.
तरी दि.04.05.2023 रोजी एमआयडीसी पोलीस ठाणे सोलापूर शहर येथील पोलीस बागवान यांनी माझ्या मित्राची मोटारसायकल ताब्यात देणेकामी माझ्याकडे पंचांसमक्ष 4000/- रू. लाच रकमेची मागणी करून लोकसेवा प्रदान करण्यासाठी अयोग्यरित्या बेकायदेशीर पारितोषण स्विकारण्याचा प्रयत्न केला आहे म्हणुन माझी श्री. इस्माईल बागवान, वय- 40वर्षे, पद-पोलीस हवालदार, ब.नं.1101, ने. एमआयडीसी पोलीस ठाणे सोलापूर शहर रा. सी-85, एकता नगर, सोलापूर यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष हा फिर्यादी जबाब दिला. स.ता.म.

(चंद्रकांत कोळी)
पोलीस निरीक्षक
ऍन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Rajan Aabaji Mane(I (Inspector)) / POBN75160 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Patre PD
पोलीस ठाणे अंमलदार
एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन
सोलापूर शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Rajan Aabaji Mane
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN75160